## नियमित दिवाणी दावा क्र.३५/२०१५ मधील नि.३९ वरील आदेश

## (संतोष वि. बंडु)

**MHWS080004522015**

वादीने सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्तीसाठी केलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, वादी यांनी सदर दावा मॅन्डेटरी व कायमचा मनाई हुकुम मिळणेबाबत केलेला आहे. प्रतिवादी हजर होवुन त्यांनी लेखी जबाब दाखल केलेला आहे. प्रकरण आज रोजी पुराव्याकरीता नेमलेले आहे. पुरावा तयार करीत असताना त्याच्या लक्षात आले की, वादी नामे सरस्वतीबाई वि. ग्यानबा चौधरीचे नावामध्ये टायपिंग चुकीमुळे व नजर चुकीने तिच्या पतीचे नांव ग्यानबा असे झाले आहे. प्रत्यक्षात तेथे ''नारायण'' असे नांव आवश्यक होते. सदरची चुक ही नजर चुकीने झाली आहे त्यामुळे वादी सदरचा अर्ज दुरूस्ती करीता करत आहे.

३. वादी क्र. २ च्या नावाच्या ठिकाणी खालील प्रमाणे दुरूस्ती करणे आहे. ''वादी क्र.२ सरस्वती हिचे पतीचे नाव ग्यानबा हे कमी करून त्या ठिकाणी नारायण असे नमुद करणे आहे''. वरीलप्रमाणे दुरूस्ती मंजुर न झाल्यास सत्यपरिस्थिती न्यायालयासमोर येणार नाही व झालेली नजरचुक कायम राहिल. सदरहु चुक दुरूस्त झाल्यास प्रतिवादीला नवीन आश्चर्यकारक बाब नाही व दाव्याचे स्वरूप देखील बदलत नाही. अशा परिस्थीतीत अर्ज मंजुर होण्याची विनंती केली.

४.        प्रतिवादी यांचे वकिलांनी नि. ३८ वर म्हणणे देवून अर्जास हरकत घेतली. त्याचें म्हणणे आधीकच्या कथनात असे की, दाव्याच्या वादी क्र.२ च्या नावात बदल केल्यास प्रत्यक्षात दाव्याचे पक्ष बदली केल्या सारखे होईल, त्यामुळे वादीचा अर्ज हा दि.प्र.संहिताचे तरतुदीला धरून नसल्यामुळे खर्चासहीत खारीज होण्यास पात्र आहे. दि. प्र.संहिताचे आदेश ६ नियम १७ तरतुदी अन्वये दावा दुरूस्ती ही फक्त दाव्याची पुराव्याची कार्यवाही सुरू होण्याअगोदरच करता येत नसुन एकदा का दाव्याची पुराव्याची कार्यवाही सुरू झाली त्यानंतर दावा दुरूस्ती करण्यास दि.प्र.संहितेच्या तरतुदीमध्ये नमुद नाही. प्रस्तुतच्या अर्जामध्ये कार्यवाही सुरू होवुन बराच कालावधी होवुन गेलेला आहे. तसेच, दाव्याची पुराव्याची कार्यवाही सुरू होण्याच्या अगोदर वादीने आपल्या अर्जात कथीत वादी क्र.२ च्या नावामध्ये दुरूस्ती कोणत्या अपरिहार्य कारणामुळे करू शकले नाही याचे सबळ कारण अर्जात नमुद नाही. वादीचा अर्ज हा तथ्यहिन बाबीवर आधारलेला असुन दाव्याची कार्यवाही प्रलंबित करण्याच्या उददेशाने प्रेरीत होवुन व दि.प्र.संहितेच्या तरतुदीला धरून केलेला नसल्याचे स्पष्ट दिसुन येत असल्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह खारीज होण्याची मागणी केली आहे.

५.        खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे —

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारामधील वादाचे निराकरण होणेसाठी महत्वाचे आहे का? | होकारार्थी |
| २. | आदेश? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## **कारण मिमांसा.**

**मुद्दा क्रमांक १ व २**

वादीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे कथन असे की, वादीचा दावा यामधिल केलेली मागणी व त्यासंबंधीची विधाने पाहता वादी क्र.२ सरस्वती हिचे पतीचे नाव ग्यानबा हे कमी करून त्याठिकाणी नारायण करणे हा शब्द टंकलेखनाच्या चुकीमुळे झाल्याचे दिसून येते. त्याऐवजी ‘‘नारायण’’ हा शब्द लिहिण्यास परवानगी दिली तर दाव्याचे स्वरूपात बदल होणार नाही अगर प्रतिवादीचे हक्कावर कोणताही परिणाम होणार नाही. सबब, प्रस्तावित दुरूस्ती ही दोन्ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण करण्यासाठी महत्वाची दिसून येते. टंकलेखनाची चुक असल्याने प्रतिवादीस खर्च देण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी दिले आहे. सबब खालील आदेश करण्यात येते आहे.

## **आदेश**

१. निशाणी ३९ चा अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

२. वादीने सदर दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करुन घ्यावी.

सहि

( श्रीमती पी.एम. कांबळे)

दिनांकः— ०६/०७/२०२३

२ रे सह दिवाणी न्यायाधीश
क. स्तर, रिसोड

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Jr.clerk | :- | P.P. Sonune Jr. Clerk |
| Court | :- | J.M.F.C.& Jt. Civil Court,J.D.,Risod. |
| Date | :- | 06/07/2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 06/07/2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 06/07/2023 |